ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-IV December 2012

# नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाच्या सराव पाठांच्या लेखन व अध्यापनात येणा–या समस्यांचा अभ्यास व उपाययोजना

जिंजर अे. एस्.
सहाय्यक प्राध्यापक
भूगोल विभाग
पी. व्ही. जी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, नाशिक
आणि
डॉ. जी. व्ही. पाटील,
अे. पी. श्री. एस्. एच्. नाईक कॉलेज ऑफ एज्युकेशन,
नवापूर, नंदूरबार

***सारांश :***

*आज बहुतांश शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये आशयापेक्षा तंत्राला आणि कागदोपत्री गंगाजळीला अधिक महत्व दिले जाते. चूकीचा अर्थ लावणे व आपल्याला वाटेल तशी संकल्पना स्पष्ट करणे. नकाशा वाचन अयोग्य पध्दतीने करणे इ. गोष्टींची कमतरता भूगोल प्रशिक्षणार्थींच्या सराव पाठ अध्यापनातून दिसून येतात. केवळ पाठयपुस्तकातील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे म्हणजे अध्यापन नव्हे तर दोन संबोध, संकल्पना आशय यांचा कार्यकारणभाव तसेच शास्त्रीय शोध का ? कोठे ? कसे ? इ. प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना शृंखलाबद्ध पध्दतीने स्पष्ट करणे आवश्यक आहे. प्रत्येक पाठातून राष्टीय मूल्ये, गाभघटक यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये होणे गरजेचे आहे.*

**मुख्य संज्ञा : सराव पाठ, अध्यापनात येणा–या समस्या.**

## 1. प्रस्तावना :

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींना अंतर्गत प्रात्यक्षिकांतर्गत भूगोल विषयाचे सराव पाठ घ्यावे लागतात. त्यात सराव पाठ अध्यापनात प्रशिक्षणार्थींना अनेक अडचणी येतात. भूगोल हा विषय शास्त्रीय विषय म्हणून गणला जातो. इ. 2 री पासून ते पदवीत्तर शिक्षणापर्यंत आपणास भूगोलाची व्याप्ती दिसून येते. प्राथमिक स्तरावर भूगोल आणि इतिहास या दोहोंचा

समावेश समाजशास्त्र या विषयांतर्गत केला जातो. माध्यमिक स्तरावर भूगोल आणि अर्थशास्त्र या दोहोंचा समावेश एकत्ररित्या करण्यात आलेला आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रवेश घेणा–या प्रशिक्षणार्थींना अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या विषय अध्यापन पध्दतींपैकी कोणत्याही दोन विषय अध्यापन पध्दतींची निवड करावयाची असते एक म्हणजे हिंदी, मराठी, इंग्रजी, विज्ञान, वाणिज्य यापैकी एक अध्यापन पध्दती आणि दुसरी इतिहास, भूगोल, गणित यापैकी एक बहुतांश वेळा कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी दुस–या अध्यापन पध्दतीसाठी भूगोल विषयाची निवड करतांना दिसून येतात. हा विषय तसा त्यांना नवाच असतो. त्यामुळे भूगोल विषयाचे सराव पाठ टाचण लेखनात, अध्यापनात प्रशिक्षणनार्थींना विविध अडचणी येतात. भूगोल विषयातील संबोध, आशय, संकल्पना, उदिद्ष्टे आणि स्पष्टीकरणे इ. गोष्टींचे आकलन होत नाही अध्यापनात त्यांना पायाभूत संकल्पना माहित नसल्यामुळे प्रशिक्षणार्थींची तारेवरची कसरत सुरु होते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होतो. बहुतांश शाळा हया घेतलेले सरावपाठ पुन्हा अध्यापन करण्याचे टाळतात. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना भेडसावणा–या समस्या दूर करण्याचा प्रयास केल्यास त्यांना भविष्यकाळात येणा–या समस्यांचा सामना करणे अवघड ठरणार नाही.

**2. संशोधन समस्या विधान :**

नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाच्या सराव पाठांच्या लेखन व अध्यापनात येणा–या समस्यांचा अभ्यास व उपाययोजना.

**3. कार्यात्मक व्याख्या :**

नाशिक तालुका – महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्हयातील एक तालुका.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय – एन्. सी. टी. ई. नुसार पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणानंतर शिक्षक म्हणून पात्र होण्यासाठी घेतले जाणारे सेवापूर्ती प्रशिक्षण. हे ज्या महाविद्यालयातून मिळते ते शिक्षणशास्त्र महाविद्यालय.

शिक्षक – प्रशिक्षणार्थी – शिक्षक म्हणून नियुक्त होण्यासाठी लागणारी आवश्यक पात्रता ज्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयातून मिळते व तेथे प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी म्हणजे शिक्षक – प्रशिक्षणार्थी होय.

भूगोल विषय – शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एक अध्यापन पध्दती म्हणजे भूगोल विषय.

<u>सराव पाठ</u> – सेवापूर्व कालखंडात घेतलेल्या प्रशिक्षणात भूगोल विषयाचे प्रत्यक्ष शाळेवर जावून विद्यार्थ्यांसमोर घेतलेले पाठ म्हणजे सराव पाठ.

<u>अध्यापन</u> – अध्ययन प्रक्रिया सुकर व परिणामकारक होण्यासाठी हाती घेतलेला नियोजनबध्द कार्यक्रम

<u>अभ्यास</u> – माहिती संकलन करुन तिचे विष्लेशण करुन निष्कर्श व शिफारशी सुचविणे.

<u>समस्या</u> – अध्यापनात येणा–या अडचणी.

<u>उपाययोजना</u> – अध्यापनातील अडचणी दूर करण्यासाठी राबविलेली रचना.

**4. गरज –**

अध्यापन हे एक शास्त्र आहे. आज 21 व्या शतकात माहिती तंत्रज्ञान युगात शिक्षण घेणा–यांची व शिक्षण देणा–यांची संख्या वाढलेली दिसून येते. संशोधकास सदर समस्येची गरज पुढील मुद्यांमुळे निर्माण झाली.

1. संशोधक स्वतः भूगोल विषयाचे उच्च पदवीधर आहे.
2. संशोधक गेली 3 ते 4 वर्षापासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयात भूगोल विषयाचे अध्यापन करीत आहे. तसेच भूगोल प्रशिक्षणार्थींना सरावपाठाचे मार्गदर्शन करीत असतांना सदर समस्या उद्भवलेली आहे.
3. सरावपाठ टाचण काढतांना, उदिद्ष्टे त्यांची स्पष्टीकरण शैक्षणिक साधन निवड व निर्मिती, आशय विश्लेषण, संकल्पना – स्पष्टीकरण, आशय विवेचन इ. बाबी विषयी अडचणी असल्यामुळे सदर संशोधनाची गरज आहे.
4. भूगोल विषयाचा प्रत्यक्ष मानवी जिवनाशी व पर्यावरणाशी संबंध असल्यामुळे भूगोल विषयाचे अध्यापन उदिद्ष्टानुगामी होण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज वाटते.

**5. महत्त्व :**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रमांर्तग शिक्षकी व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. सराव पाठ घेण्यासंदर्भात प्रशिक्षणार्थींना पुरेसा विषय अध्यापनाचा परिचय नसतो, कारण ब–याच प्रशिक्षणार्थींना दुय्यम अध्यापन पध्दती म्हणून भूगोल विषय अध्यापन पध्दतीची निवड करावी लागते. सदर संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येते.

प्रशिक्षणार्थींना सरावपाठ घेतांना येणा–या अडचणी जाणून त्यावर उपाय योजना करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

प्रशिक्षणार्थी भूगोल विषय सराव पाठ काढणे, सुनियोजित अध्यापन करणे, योग्य अध्यापन पध्दतीचा वापर करणे, शैक्षणिक साहित्याची निवड इ. बाबींसाठी प्रस्तूत संशोधन हे महत्त्वपूर्ण ठरते.

आजचा प्रशिक्षणार्थी हा उदयाचा उत्तम आणि आदर्श शिक्षक होण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

प्रशिक्षणार्थींना अध्यापन पध्दती अध्यापन सूत्रे, मूल्ये, गाभाभूत घटक इ. विषयी माहिती मिळविण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे ठरते.

भूगोल विषयाचा प्रत्यक्ष मानवी जीवनाशी असलेला संबंध जाणून घेवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य रुजविण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे वाटते.

भूगोल विषय सरावपाठ टाचण आणि अध्यापन सुव्यस्थित आणि सुनियोजित होण्याकरिता हे संशोधन महत्त्वाची भुमिका बजावते. त्यामुळे भूगोल विषयात अध्यापन करतांना आणि पाठ टाचण काढतांना येणा—या समस्यांचे प्रमाण कमी होईल यात शंकाच नाही.

**6. संशोधनाची उदिद्ष्टे :**

1. बी. एड्. प्रशिक्षणार्थी भूगोल अध्यापन पध्दती निवडण्यामागील कारणांचा शोध घेणे.
2. शिक्षक — प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाचे सराव पाठ टाचण लेखन नियोजन करतांना येणा—या अडचणींचा शोध घेणे.
3. प्रशिक्षणार्थींना उदिद्ष्टे व स्पष्टीकरणे लिहीतांना येणा—या अडचणींचा शोध घेणे.
4. प्रशिक्षणार्थींना आशय — विश्लेषण आणि विवेचन करतांना येणा—या अडचणींचा शोध घेणे.
5. प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाचे अध्यापन करतांना व शैक्षणिक साधनांची निवड करतांना येणा—या समस्यांचा शोध घेणे.
6. प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाचे अध्यापन करतांना व शैक्षणिक साधनांची निवड करतांना येणा—या समस्यांचा शोध घेणे.
7. प्रशिक्षणार्थींना भूगोल विषय सरावपाठ घेतांना येणा—या अडचणींचा शोध घेवून उपाययोजना सूचविणे.

**7. गृहितके :**

1. बहुतांश शिक्षक प्रशिक्षणार्थी दुय्यम विषय अध्यापन पध्दती म्हणून भूगोल विषयाची निवड करतात.
2. भूगोल विषयाचे अध्यापन करतांना वाणिज्य शाखेतील प्रशिक्षणार्थींना सरावपाठ लेखन करतांना

अडचणी येतात.

3. शिक्षक प्रशिक्षणार्थींना उदिद्ष्टे आणि स्पष्टीकरणे लिहीतांना अनेकविध अडचणी आहेत.
4. प्रशिक्षणार्थी ग्रंथालयाचा वापर पुरेशा प्रमाणात करीत नाहीत.
5. प्रशिक्षणार्थींचा भूगोलातील आशय संदर्भात आणि पायाभूत संकल्पनांच्या संदर्भात माहितीचा अभाव दिसून येतो.
6. बहुतांश प्रशिक्षणार्थी आपल्या सहकार्यांच्या पाठ टाचणांचे उभेउभे चौर्यकर्म करतात. सरावपाठ टाचण लेखन समजुन व आकलन करुन घेत नाहीत.

**8. परिकल्पना :**

नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक – प्रशिक्षणार्थींना भूगोल विषयाच्या सरावपाठ टाचण लेखन आणि अध्यापनात विविध अडचणी दिसून येतात. प्रशिक्षणार्थींना भूगोल विषय सरावपाठ टाचणासंदर्भात यथायोग्य मार्गदर्शन केल्यास त्यांना पाठ टाचण लेखनात येणा–या समस्या दूर होतील.

**9. संशोधन व्याप्ती व मर्यादा :**

1. प्रस्तुत संशोधन नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाती भूगोल विषय अध्यापन पध्दतीसाठी व्याप्त व मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन नाशिक तालुक्यातील 9 शिक्षणशास्त्र महाविद्यालया पूरतेच मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन विषयात केवळ भूगोल विषय अध्यापन पध्दती सरावपाठ टाचण लेखन आणि अध्यापन इ. बाबींचाच विचार केला जाणार आहे.
4. सदर संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भूगोल विषयाचे अध्यापन करणा–या प्रशिक्षणार्थी व मार्गदर्शकांपूरतेच मर्यादित आहे.
5. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2011 / 2012 साठीच मर्यादित आहे.

**10. संशोधन पध्दती :**

नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भूगोल विषयाचे अध्यापन पध्दतीतील प्रशिक्षणार्थींना सराव पाठटाचण लेखन व अध्यापनात येणा–या अडचणी जाणून घेण्यासाठी आणि उपाययोजना करण्यासाठी प्रस्तुत सशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**11. जनसंख्या व न्यादर्श निवड :**

**जनसंख्या :**

1. नाशिक तालुक्यातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या 9 शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही जनसंख्या आहे.
2. नाशिक तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भूगोल विषय अध्यापन पध्दतीची निवड केलेले सर्व प्रशिक्षणार्थी ही जनसंख्या आहे.

**न्यादर्श / नमुना निवड :**

1. प्रस्तुत संशोधनात नमुना म्हणून नाशिक तालुक्यातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी सहेतुक नमुना पध्दतीनुसार 55 टक्के म्हणजेच 4 शिक्षणशास्त्र महाविद्यालय नमुना म्हणून निवडले आहेत.
2. नमुना गटातील निवडलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भूगोल अध्यापन पध्दतीची निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींपैकी 5 टक्के प्रशिक्षणार्थी नमुना म्हणून निवडले आहेत. म्हणजेच 40 प्रशिक्षणार्थींची स्तरीय न्यादर्श निवड पध्दतीनुसार नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

**12. संशोधनाची साधने :**

**अ. माहिती संकलन साधने –**

1. प्रशिक्षणार्थीसाठी प्रश्नावली
2. मार्गदर्शकांच्या मुलाखती
3. सराव पाठ निरीक्षण तक्ते

**ब. संख्याशास्त्रीय साधने –**

1. आलेखात्मक चित्रण
2. वारंवारिता तक्ता
3. शेकडेवार

**13. संशोधन कार्यपध्दती :**

संशोधक गेली 3 वर्षापासून भूगोल अध्यापन पध्दतीचे अध्यापन करीत आहे. त्यामुळे दरवर्षी भूगोल विषय सरावपाठांचे मार्गदर्शन संशोधकाकडून केले जात असतांना तसेच सराव पाठांचे निरीक्षण करतांना प्रस्तुत समस्या निर्माण झाली. शिक्षक प्रशिक्षणार्थींना भूगोल अध्यापन पध्दती निवडण्यामागील कारणे सर्व प्रथम प्रश्नावलीव्दारा संशोधकाकडून जाणून घेण्यात आली. संशोधक

स्वतः भूगोलाचा उच्च पदवीधर आहे. स्वतः संशोधक प्रशिक्षण घेतांनाही संशोधकास सरावपाठ टाचण काढतांना येणा–या अध्यापनात अनुभवलेल्या समस्यांची यादी तयार केली. त्यानंतर एक आदर्श प्रश्नावली तयार करुन भूगोल विषय प्रशिक्षणार्थींकडून भरुन घेण्यात आली. त्याव्दारा नमुना गटाची माहिती संकलन करण्यात आली. त्याच प्रमाणे नमुना म्हणून निवडलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भूगोल मार्गदर्शकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि विवि समस्या व त्यामागील कारणांचा शोध घेण्यात आला.

प्राप्त माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करुन संख्याशास्त्रीय कोष्टके तयार करुन शेकडेवारी काढली. वारंवारिता तक्त्यावरुन आलेख चित्रण काढण्यात आले. मिळालेल्या संख्याशास्त्रीय माहिती वरुन निष्कर्श काढले व निष्कर्षानुसार साधक व उपयुक्त अशा शिफारशी मार्गदर्शकांना व प्रशिक्षणार्थींना देण्यात आल्या आणि उपयुक्त अशा उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

**14. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

**अ. प्रश्नावली ( प्रशिक्षणार्थी प्रतिसाद ) :**

1. भूगोल विषय अध्यापन पध्दती निवडी मागील स्वतः चे मत काय ?

( आवड – 10, सोपी पध्दत – 25, वाणिज्य शाखा म्हणून – 5 )

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 15 | 37.5 टक्के |
| 2 | नाही | 20 | 50.0 टक्के |
| 3 | कधी कधी | 05 | 12.5 टक्के |
| **एकूण** | | 40 | 100 टक्के |

2. भूगोल विषयाचे सराव पाठ टाचण लेखन संदर्भात मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन मिळते काय ?

**अर्थनिर्वचन :**

एकूण 40 प्रशिक्षणार्थी पैकी 15 प्रशिक्षणार्थींना सरावपाठ मार्गदर्शन मिळते तर 20 प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शनाचा अभाव आहे आणि 5 प्रशिक्षणार्थींना ब–याच वेळा मार्गदर्शनापासून वंचित रहावे लागते.

3. भूगोल विषय सरावपाठ टाचणाचा आदर्श पाठ टाचण नमुना व पाठ दिग्दर्शन आपल्या मार्गदर्शकांकडून घेतला जातो का ?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 17 | 42.5 टक्के |
| 2 | नाही | 23 | 57.5 टक्के |
| **एकूण** | | 40 | 100 टक्के |

**अर्थनिर्वचन :**

एकूण 40 प्रशिक्षणार्थी पैकी 23 प्रशिक्षणार्थींना सराव पाठ टाचण लेखन आदर्श नमुना दिला जात नाही. 17 प्रशिक्षणार्थींना टाचण लेखन व पाठ दिग्दर्शन दिला जातो.

4. भूगोल विषय सरावपाठ घेण्यापूर्वी आपणाकडून मार्गदर्शक तयारी करुन घेतात का ?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 16 | 40 टक्के |
| 2 | नाही | 19 | 47.5 टक्के |
| 3 | कधी कधी | 05 | 12.5 टक्के |
| **एकूण** | | 40 | 100 टक्के |

**अर्थनिर्वचन :**

16 प्रशिक्षणार्थींना सरावपाठ घेण्यापूर्वी मार्गदर्शन तयारी मिळत नाही तर 19 प्रशिक्षणार्थींना ते मिळते, मात्र 5 प्रशिक्षणार्थींना कधी कधीच मार्गदर्शनाचा योग येतो.

6. भूगोल विषय सरावपाठ टाचण लेखन करतांना कोणत्या पंचपदीवर आपणास अडचण येते ?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 02 | 5.0 टक्के |
| 2 | आशय विवेचन | 06 | 15.0 टक्के |
| 3 | संकलन | 02 | 5.0 टक्के |
| 4 | उपयोजन | 04 | 10.0 टक्के |
| 5 | उदिद्ष्टे स्पष्टीकरणे | 26 | 65.0 टक्के |
| **एकूण** | | 40 | 100 टक्के |

**अर्थनिर्वचन :**

सरावपाठ टाचण लेखन करतांना 40 प्रशिक्षणार्थी पैकी 4 प्रशिक्षणार्थींना प्रस्तावना व संकलन पायरी लेखनात अडचणी येतात, तर 6 प्रशिक्षणार्थींना आशय – विवेचनात समस्या उद्‌भवते आणि 4 प्रशिक्षणार्थी उपयोजन पायरी लेखन करतांना अडचणीत येतात. उर्वरीत 26 प्रशिक्षणार्थी म्हणजेच सर्वाधिक प्रशिक्षणार्थींना उदिद्ष्टे व त्यांी स्पष्टीकरणे लिहीतांना अडचणी येतात.

7. भूगोल विषयाचे सराव पाठ टाचण घेतांना शैक्षणिक साधनांची निर्मिती व वापर केला जातो का ?

| अ.क. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 20 | 50 टक्के |
| 2 | नाही | 10 | 25 टक्के |
| 3 | कधी कधी | 10 | 25 टक्के |
| **एकूण** | | 40 | 100 टक्के |

**अर्थनिर्वचन :**

40 प्रशिक्षणार्थी पैकी 20 प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक साधन निर्मिती करतांना व पाठ घेतांना वापरतात देखील परंतू 20 प्रशिक्षणार्थी शैक्षणिक साधन निर्मिती करीत नाहीत व काही प्रमाणात वापर देखील करीत नाहीत.

**15. निष्कर्ष :**

**अ. प्रशिक्षणार्थी संदर्भीय निष्कर्ष –**

1. 60 टक्के प्रशिक्षणार्थी बी. एड्. अभ्यासक्रमात दुय्यम अध्यापन पध्दती म्हणून भूगोल विषयाची निवड करतात.
2. वाणिज्य शाखेतील प्रशिक्षणार्थी गणित अध्यापन पध्दती बरोबर भूगोल विषयाची निवड करतात.
3. 60 टक्के भूगोल प्रशिक्षणार्थींना सरावपाठ टाचण लेखनात अडचणी येतात.
4. 47 टक्के प्रशिक्षणार्थींकडून प्रत्यक्ष सरावपाठ घेण्यापूर्वी तयारी करुन घेतली जात नाही.
5. 50 टक्के प्रशिक्षणार्थींना भूगोल विषय मार्गदशकांकडून मार्गदर्शन पुरेशा प्रमाणात मिळत नाही.
6. भूगोलाचे प्रशिक्षणार्थी सरावपाठ घेण्यापूर्वी ग्रंथालयाचा वापर पुरेशा प्रमाणात मिळत नाही.
7. 33 टक्के प्रशिक्षणार्थी आपल्या सहका–यांनी यापूर्वी घेतलेल्या सरावपाठाचे उभे उभे लेखन करतात.

8. 65 टक्के भूगोल प्रशिक्षणार्थींना सरावपाठ टाचण लेखन करतांना उदिद्ष्टे व त्यांची स्पष्टीकरणे लिहीतांना अडचणी येतात.
9. 35 टक्के इंग्रजी माध्यमाच्या प्रशिक्षणार्थींना इंग्रजी भाषेतून मार्गदर्शन मिळत नाही.
10. 50 टक्के प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष सरावपाठ घेण्यापूर्वी शैक्षणिक साहित्याची निर्मिती करुन अध्यापनात त्याचा वापर करतात.
11. 47 टक्के प्रशिक्षणार्थीना भूगोल विषयातील पायाभूत व मुलभूत संकल्पना योग्य आकलन झालेले नसते.
12. भूगोल प्रशिक्षणार्थींना सरावपाठ घेतांना नकाशा वाचनात अनेकविध अडचणी येतात.
13. 50 टक्के प्रशिक्षणार्थी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सरावपाठ घेतांना वापर करीत नाही ते त्यांना उपलब्ध करुन दिले जात नाही.

**ब. मार्गदर्शक संदर्भीय निष्कर्ष –**

1. 57 टक्के प्रशिक्षणार्थींना भूगोल विषय मार्गदर्शकांकडून आदर्श नमुना सरावपाठ टाचण लेखन आणि पाठाचे दिग्दर्शन दिले जात नाही.
2. 40 टक्के भूगोल विषय मार्गदर्शकांचे असे मत आहे की, सर्वाधिक जास्त विद्यार्थी संख्या ही भूगोल विषयासाठी असते त्यामुळे मर्यादित कालावधीत विचार करता सर्व भूगोल प्रशिक्षणार्थींना वैयक्तिक मार्गदर्शन करणे शक्य नसते.
3. 90 टक्के प्रशिक्षणार्थींच्या सरावपाठ निरीक्षणासाठी विषयानुसार शिक्षक नसतात म्हणून गुणदानात तफावत निर्माण होते.
4. बी. एड्. शैक्षणिक कालावधी हा अल्प असल्यामुळे शाळांच्या नियोजनानुसार मिळणा–या कालखंडातच सरावपाठांचे नियोजन करावे लागते परिणामी एका निरीक्षक शिक्षकास 10 ते 12 पाठांचे एकाच दिवशी निरीक्षण करावे लागते त्यातून सरावपाठ निरीक्षण योग्य रितीने होत नाही.
5. 40 टक्के मार्गदर्शन शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी प्रशिक्षणार्थींना प्रेरणा देत नाही.
6. 60 टक्के प्रशिक्षणार्थींना सराव पाठाचा प्रत्यक्ष जिवनमूल्यांची सांगड घालता येत नाही.
7. 70 टक्के प्रशिक्षणार्थींच्या सराव पाठाच्या वेळी वर्ग नियंत्रण नसते कारण शक्यतो भूगोल विषयाचे तास हे शेवटीच असतात. परिणामी अध्यापन प्रभावी व दर्जेदार होत नाही.
8. 47 टक्के प्रशिक्षणार्थींना भूगोल मार्गदर्शकांकडून उचित मार्गदर्शन मिळत नाही.
9. 60 टक्के मार्गदर्शकांचे असे मत आहे की, सराव पाठ सर्व शाळांवर एकाच वेळी लावण्यात आल्यामुळे मिळणारे पाठयांश शक्यतो सारखेच असतात त्यामूळे विद्यार्थी आपआपसात सराव

पाठ टाचण लेखन करुन घेतात त्यातून त्यांना सरावपाठ घेतांना अडचणी येतात.

**16. शिफारशी व उपाययोजना :**

1. बी. एड्. प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक अर्हता तसेच आशयज्ञान चाचणी घेवूनच अध्यापन पध्दतींचे वाटप करावे. कोणत्याही एका विषयास जास्त विद्यार्थी संख्या येणार नाही याची दक्षता महाविद्यालयाकडून घ्यावी.
2. प्रत्येक आशय अध्यापन पध्दतीचे आदर्श नमुना सरावपाठ टाचणांचे व पाठ दिग्दर्शन मार्गदशकांनी करावे.
3. सरावपाठ नियोजन अचूकपणे करण्यात यावे एका निरीक्षकास 7 किंवा 8 पेक्षा जास्त पाठ निरीक्षण करण्यासाठी देवू नये.
4. प्रशिक्षणार्थींना सरावपाठ टाचण लेखनात येणा–या अडचणी व उणिवा त्यांच्या लक्षात आणून दिल्या पाहीजेत, ज्यामुळे चूकांची पुनरावृत्ती टळेल.
5. प्रशिक्षणार्थींना विषय शिक्षकांनी सराव पाठ घेण्यापूर्वी सखोल मार्गदर्शन करावे.
6. विषय शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहन द्यावे.
7. गंथपालांनी प्रशिक्षणार्थींना आवश्यक असलेली संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध करुन द्यावीत.
8. मागील वर्षीच्या चांगल्या सरावपाठांचे चित्रिकरण करुन नवीन विद्यार्थ्यांना संगणकीय पडद्यावर त्यांचे दिग्दर्शन करावे.
9. प्रशिक्षणार्थींनी स्वतः समजून आकलन करुन स्व हस्ताक्षरात सरावपाठ टाचण लेखन करावे.
10. प्रशिक्षणार्थींनी सरावपाठ घेतांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शैक्षणिक साधनांचा जास्तीत – जास्त वापर करावा.
11. सरावपाठ निरिक्षणासाठी विषयनिहाय शिक्षक असावेत.
12. निरीक्षकांनी एका वेळी एकाच सराव पाठाचे पूण निरीक्षण करावे.
13. निरीक्षकांनी पाठ निरीक्षण करतांना वस्तुनिष्ठ रहावे पूर्वग्रहांना थारा देवू नये व्यक्ती निष्ठता कमी प्रमाणात असावी.
14. प्रशिक्षणार्थींच्या सरावपाठांचे चित्रिकरण करुन नंतर त्यांना दाखविण्यात यावीत व त्यातून त्यांच्या चूकांचे निर्मूलन करण्यात यावे.
15. मार्गदर्शकांनी आपल्या विषयासंदर्भात प्रशिक्षणार्थींना निर्माण होणा–या समस्या त्यांची कारणे शोधून ते दूर करण्यासाठी उपाययोजना तयार करावी.

**17. संदर्भ ग्रंथसूची :**

1. Best, J.W. & Khan, J.V.( 1967), Research in Education, New Delhi, Practice hall of India.
2. कदम, चा. प., ( 1989 ). शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नुतन प्रकाशन.
3. पंडित, ब. बि., ( 2001 ). शिक्षणातील संशोधन, पुणे : नुतन प्रकाशन.
4. भिंताडे, वि. रा., ( 1999 ). शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे : नुतन प्रकाशन.
5. मूळे, रा. श., ( 1987 ). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यपीठ ग्रंथनिर्मिती.
6. चव्हाण, के. एस्. ( एप्रिल 2011 व जुलै 2011 ). शिक्षणातील मर्मदृष्टी, नाशिक : इनसाईट पब्लीकेशन.
7. सरावपाठ मार्गदर्शिका क. 2 ( 2007 ). पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.